**Annexure - 6**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

शंकरराव चौक, कल्याण, जि.ठाणे (महाराष्ट्र) (प) ४२१ ३०१

जा.क्र.कडोंमपा/उआ/प्रकल्प/ २८

दिनांक:– १३/०८/२०१४

## —: कार्यादेश :—

विषय :— क.डों.म.पाचे मौजे उंबर्डे, कल्याण (प) येथील बायो मेडीकल वेस्ट डिस्पोजल प्लान्टची दुरुस्ती करुन पूढील १० वर्षे कालावधीकरीता आधुनिका यंत्र सामुग्रीसह देखभाल व दुरूस्ती करून चालवणे बाबत.

संदर्भ :— १) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २२६, दि २९/०३/२०१४ अन्वये.
२) करारनामा करणेकामी मा. आयुक्तांकडील प्राधिकृत अधिकरावर दि.२४/०७/२०१४ रोजीची मंजूरी.

उपरोक्त संदर्भिय विषयांकीत प्रकरणी आपण कल्याण डोंबिवली महापालिके कडे सादर केलेल्या निविदेच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ०१ नुसार मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.२२६, दि.२९/०३/२०१४ अन्वये मंजूर करण्यात आला असून तद् अनुषंगाने करारनामा करणे कामी संदर्भ क्र. ०२ मा. आयुक्त महोदयांनी दि. २४/०७/२०१४ रोजी मंजूरी प्रदान केली आहे. सबब त्या नुसार प्रस्तुत प्रकरणी उभयपक्षी दि. ०८/०८/२०१४ रोजी करण्यात आलेल्या करारनाम्याचे अनुषंगाने सदरील कार्यादेश देण्यात येत असून खालील अटी शर्तीस अधीन राहून हा कार्यादेश अमलांत येईल.

* उभयपक्षी केलेल्या नोंदणीकृत करारनाम्यातील अटी,शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

* मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २२६, दि. २९/०३/२०१४ अन्वये सदर प्रकल्प आधुनिक यंत्र सामुग्रीसह देखभाल व दुरूस्ती करून पूढील १० वर्षे कालावधी चालवावयचा आहे.
प्रकल्पास आवश्यक असलेली महापालिकेच्या मालकीची मौजे उंबर्डे येथील १ एकर जागा रु. १ प्रती चौ.मी.प्रती वर्षाच्या दराने दहा वर्षाच्या कालावधीकरीता लिज ने देण्यात येईल. लिज रेन्ट प्रत्येक वर्षी ३१मार्च पूर्वी क.डों.म.पा.कडे जमा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

* आपण आपल्या निविदेत नमूद केल्या प्रमाणे रॉयल्टी रक्कम रु.५.३१ लक्ष (अक्षरी रूपये पाच लक्ष एकतीस हजार मात्र.) प्रति माह महापालीकेस देणे आहे. व करारनाम्यातील अनुक्रमांक ३ नुसार शुल्क आकरणी करणे आपणावर बंधनकारक राहील.

* आपणास महापालिका क्षेत्रातील व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे कार्यक्षेत्रातील , दवाखाने, पॅथॉलॉजिकल लॅब, नर्सिंग होम, रक्तपेढी, क्लिनीक, इत्यादी मधून बायो मेडिकल वेस्ट जमा करणे व त्यांची वाहतूक करून प्रक्रिया करणे. तसेच सदर प्रकल्प आधुनिक यंत्र सामुग्रीसह देखभाल व दुरूस्ती करणे या तत्वावर उभारावयाचा आहे.

* सदर प्रकल्प आधुनिक यंत्र सामग्री सह दुरूस्तीची कालमर्यादा ३ महीने (पावसाळा वगळुन) असुन

* सदर प्रकल्पाची उभारणी बायो मेडिकल वेस्ट नियम, १९९८ व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांनी ऑगस्ट २००३ अन्वये केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार नियम अस्तित्वात आलेले आहेत. त्या तरतूदींनुसार काम करणे आपणांवर बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात केंद्रशासन, राज्यशासन व महापालिकेकडील वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश हे निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.१२

* या प्रकल्पाकरिता आवश्यक शासकीय परवानग्या मिळविणे ही निविदाधारकारची जबाबदारी राहील. मुख्यत्वे करून महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ कडिल संमतीपत्र मिळविणे व प्रकल्पास त्यांची मान्यता घेणे. वेळोवळी नूतनीकरण करणे याची पूर्ण जबाबदारी निविदाधारकांवर राहील. शासकीय कामकाजाकरिता आवश्यक असलेली कागदपत्रे व त्यांचा अभिलेख ठेवण्याची जबाबदारी निविदाधारकावर राहील.

सदर दुरूस्तीची कालमर्यादा ३ महीने (पावसाळा वगळुन) करणे आपणांवर बंधनकारक राहील. सुरक्षा अनामत रक्कम भरल्याची पावती/बॅंक गॅरन्टी सादर केल्यानंतर हा कार्यादेश विधीग्राह्य राहील.

उप आयुक्त, (प्रकल्प)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका.
कल्याण.

प्रति,
मे.ई.एन.व्हिजन,इनविरो इंजि.प्रा.लिमिटेड
२०८, जी. टॉवर शंकेश्वर कॉम्प्लेक्स,
संग्रमपुरा सुरत–३९५००२, गुजरात.